

प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे शहर प्रदूषणाच्या विळख्यात

e Paper

# दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 18/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 5 || अंक 270 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# सुप्रीम कोर्टात 19 नोव्हेंबरला होणार सुनावणी

## • महापालिका निवडणुकीत आरक्षणाच्या 50 टक्के मर्यादेचे उल्लंघन

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. तर दुसरीकडे या निवडणुका पुन्हा एकदा वादात सापडल्या आहेत. निवडणुकांमध्ये आरक्षणाची मर्यादा ५० टक्के मर्यादेचे उल्लंघन झाल्याचा दावा करणाऱ्या याचिकेवर आता सुप्रीम कार्ट सुनावणी घेणार आहे. ही सुनावणी १९ नोव्हेंबर रोजी होणार आहे.सुप्रीम कोर्टने याबाबत सहमती दर्शवली आहे.**






याचिकेवर १४ नोव्हेंबर शुक्रवारी न्यायालयाने राज्य निवडणूक आयोग, राज्याचे मुख्य सचिव तसेच महसूल व नगरविकास विभागाच्या सचिवांना नोटीस बजावली होती.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागास प्रवर्गांच्या आरक्षणाला ५० टक्क्यांची मर्यादा आखून देत सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये ऐतिहासिक निकाल दिला. . त्या आरक्षण मयदिचे महाराष्ट्रात होत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये उल्लंघन झाले आहे, असा दावा करीत विकास गवळी यांनी सर्वोच्च न्यायालयात नव्याने याचिका दाखल केली.त्यांच्या याचिकेची शुक्रवारी न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने गंभीर दखल घेतली. तसेच याचिकेवर सुनावणी घेण्याचे निश्चित करीत खंडपीठाने याचिकेत प्रतिवादी असलेल्या राज्य निवडणूक आयोग, राज्याचे मुख्य सचिव यांच्यासह महसूल आणि नगरविकास विभागाच्या सचिवांना नोटीस बजावली होती. दरम्यान, आता या याचिकेवर १९ नोव्हेंबर रोजी सुनावणी होणार आहे.

# विद्यापीठांनी मूल्याधिष्ठित शिक्षणासाठी प्रयत्नशील राहावे - राज्यपाल

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेला जागतिक स्तरावर नेण्यासाठी सातत्यपूर्ण आणि संघटित प्रयत्नांची आवश्यकता आहे. केवळ योजना तयार करणे पुरेसे नसून त्यांची व्यवहार्य अंमलबजावणी सातत्याने झाली पाहिजे. विद्यापीठांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय गुणांकन पातळी सुधारण्यासाठी सतत प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.**



तसेच प्रत्येक विद्यापीठाशी थेट जोडलेले टास्क फोर्स स्थापन करून ते दर पंधरवड्याला प्रगती अहवाल सादर करतील अशी प्रणाली निर्माण करावी, असे प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.राजभवन येथे राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० आणि व्हिजन महाराष्ट्र २०४७' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव वेणुगोपाल रेड्डी तसेच राज्यातील सर्व विद्यापीठांचे कुलगुरू उपस्थित होते.राज्यपाल आचार्य देवव्रत म्हणाले की, विद्यापीठे ही विद्या आणि संस्कारांची केंद्रे असावीत. शिक्षक हे विद्यार्थ्यांशी आत्मीयतेने जोडले जावेत. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील संवाद व सहकार्य वाढले तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास निश्चित होईल. तसेच खेळ, एनसीसी, एनएसएस यासारख्या उपक्रमांत विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. तंदुरुस्त शरीर आणि सुदृढ मन हेच चांगल्या शिक्षणाचे आधारस्तंभ आहेत, असेही त्यांनी यावेळी सांगितले.विद्यापीठांनी रोजगारक्षम अभ्यासक्रम विकसित करावेत जे थेट उद्योगजगताशी निगडित असतील. शिक्षण हे समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीशी जोडले गेले पाहिजे. नव्या तंत्रज्ञानाशी सुसंगत राहण्यासाठी शिक्षक आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण आवश्यक आहे.

प्रशिक्षण जितके गुणवत्तापूर्ण, तितकी शिक्षणाची गुणवत्ता उंचावेल. प्रशिक्षण केंद्रांचा दर्जा अधिक उंचवण्यावर भर देण्याचे आवाहन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी केले.

# रोकडे दाम्पत्याला 'सावित्रीज्योती पुरस्कार'

## • 'शबनम न्यूज'च्या गजाला सय्यद यांना आदर्श पत्रकारिता पुरस्कार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे - विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समिती, काषाय प्रकाशन आणि बंधुता प्रकाशनतर्फे संविधान दिनानिमित्त २५ नोव्हेंबर रोजी 'आम्ही सावित्रीच्या मायलेकी' या महाकाव्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.**





बंधुता चळवळीत ५१ वर्षे योगदान दिल्याबद्दल प्रकाश रोकडे आणि मंदाकिनी रोकडे यांना 'क्रांतिसूर्य सावित्रीज्योती पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.

तसेच शबनम न्यूज या वृत्तसंस्थेच्या वार्ताहर गजाला सय्यद यांच्यासह अन्य महिला पत्रकारांना 'आदर्श पत्रकारिता पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती विश्वबंधुता साहित्य परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.नवी पेठ येथील एस. एम. जोशी सभागृह येथे होणाऱ्या या काव्यसंमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ साहित्यिका डॉ. सविता पाटील यांच्या हस्ते होणार आहे, तर ज्येष्ठ साहित्यिका डॉ. अश्विनी धोंगडे यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावेळी गजाला सय्यद, मेधा पालकर, महिमा ठोंबरे, नम्रता फडणीस, सुवर्णा चव्हाण, कल्पना खरे-साठे, प्रीती पाठक, अर्चना मोरे, कल्याणी फडके, शिवानी पांढरे, वनिता चौधरी, सायली नलावडे-कविटकर यांना 'संविधान सन्मान आदर्श पत्रकारिता पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.

# आगामी निवडणुकीसाठी शिवसैनिकांनो तयारी करा

## सचिन अहिर यांचे पदाधिकाऱ्यांना आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : आगामी पिंपरी-चिंचवड महापालिकेसाठी शिवसैनिकांनी, पदाधिकाऱ्यांनी तयारीला लागावे. एकदिलाने, एकमताने काम करावे. शिवसेनेने केलेली कामे, प्रश्नांची केलेली सोडवणूक तळागाळातील मतदारापर्यंत पोहोचवण्याचे काम शिवसैनिकांनी करावे, अशा सूचना शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पुणे जिल्हा संपर्क प्रमुख, आमदार सचिन अहिर यांनी पदाधिकाऱ्यांना शनिवारी (दि. १५) केल्या.**



आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांची ताथवडे येथील कासा दी सिल्व्हर हॉटेलमध्ये आढावा बैठक झाली. यावेळी पदाधिकाऱ्यांना अहिर यांनी मार्गदर्शन केले. या बैठकीसाठी पिंपरी-चिंचवड शहर संपर्क प्रमुख केसरीनाथ पाटील, जिल्हा प्रमुख, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, शहर प्रमुख संजोग वाघेरे, माजी शहर प्रमुख सचिन भोसले, जिल्हा संघटिका अनिता तुतारे, पुनम पोतले, शहर संघटिका रूपाली आल्हाट, जिल्हा समन्वयक सुशिला पवार, रोमी संधू, हाजी दस्तगीर मणियार, निवडणूक प्रभारी अशोक वाळके, युवा सेनेचे युवाधिकारी चेतन पवार, कैलास नेवासकर, वैभवी घोडके, कल्पना शेटे, संतोष म्हात्रे, गौरी घंटे, वैशाली कुलथे, वैशाली काटकर, सुषमा शेलार, तुषार नवले, हरेश नखाते, निलम म्हात्रे, ज्ञानेश्वर शिंदे, महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांसह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आगामी महापालिका निवडणुकीसाठी इच्छुकांची तयारी, आढावा, संघटनात्मक बांधणी कशी सुरू आहे, याची संपर्क प्रमुख अहिर यांनी माहिती घेतली. तसेच सर्व प्रभागात उमेदवार तयार ठेवा.

एकदिलाने काम करा. शिवसेनेने केलेली कामे, प्रश्नांची केलेली सोडवणूक तळागाळातील मतदारापर्यंत पोहोचवण्याचे काम शिवसैनिकांनी करावे, असे आवाहनही अहिर यांनी केले.

# मतदानासाठी नागरिकांमध्ये जनजागृती वाढवा!

## आयुक्त श्रावण हर्डीकर यांचे निर्देश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : आगामी पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीनिमित्त शहरातील मतदान केंद्रांची स्थळनिश्चिती, निवडणूक कक्ष अधिकाऱ्यांची नेमणुकी, मतदान केंद्रांची सुविधा, अपंगजनांसाठी सोयी, मतदान कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, ईव्हीएमची सुरक्षितता, मतदार यादी अद्ययावत करणे, प्रभागांतील आवश्यक पायाभूत दुरुस्ती, प्रारूप मतदार यादीतील बदल आणि मतदानासाठी नागरिकांमध्ये जनजागृती वाढवण्याचे तसेच तक्रार निवारण यंत्रणा सक्षम करण्याचे निर्देश आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी सार्वत्रिक निवडणुकीसह महापालिकेच्या विविध विभागांच्या कामकाजाचा सखोल आढावा घेतला.या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, सहायक आयुक्त मनोज लोणकर, नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, शहर अभियंता मकरंद निकम, मुख्य आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, सहशहर अभियंता बापू गायकवाड, मनोज शेठीया, अनिल भालसाकळे, स्मार्ट सिटीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजयराज यादव, उपायुक्त अण्णा बोदडे, राजेश आगळे, डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, सिताराम बहुरे, संदीप खोत, ममता शिंदे, उपआरोग्य वैद्यकीय अधिकारी अभयचंद्र दादेवार, सहाय्यक आयुक्त अतुल पाटील, किरणकुमार मोरे, अजिंक्य येळे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, अमित पंडित, निवेदिता घार्गे, पूजा दूधनाळे, अश्विनी गायकवाड, मुख्य उद्यान अधिकारी महेश गारगोटे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.बैठकीत प्रथम शहरातील दैनंदिन सेवा, स्वच्छता व्यवस्था, खड्डेमुक्ती मोहिम आणि मास्टर प्लॅन अंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांची माहिती आयुक्तांनी मागवली. अवैध होर्डींग हटविण्याची मोहीम, रस्ते प्रकाशयोजना, जलपुरवठा व ड्रेनेज यंत्रणेची स्थिती याबाबतही सविस्तर चर्चा करत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.तसेच, आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या तयारीसंदर्भात प्रशासनाच्या सर्व शाखांकडून अहवाल सादर करण्यात आले. नागरिकांच्या तक्रारींवर तातडीने कार्यवाही करण्यासाठी नियंत्रण कक्ष अधिक सक्षम करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सर्व विभागांनी समन्वय राखत प्रलंबित कामे वेगाने पूर्ण करावीत, असे निर्देश आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. महापालिकेच्या मूलभूत सुविधा आणि सेवांवर अधिक भर देऊन कार्यक्षमता वाढवण्याचे आदेशही आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दिले.सर्व प्रभागांना विशेष मोहीम राबवून अवैध होर्डिंग तातडीने हटवण्याचे निर्देश देण्यात आले. सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या किंवा वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या बोर्डांवर तत्काळ कारवाई करावी, तसेच परवानाधारक होर्डिंगची माहिती अद्ययावत ठेवून महसूल विभागाशी समन्वय वाढवावा, अशा सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

# 'पीएमपी'मध्ये दागिने चोरणाऱ्या महिलेला अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे शहरातील नवले ब्रीजच्या परिसरात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकचा ब्रेक निकामी झाल्याने एकापाठोपाठ एक वाहनांना धडक देत, काही अंतर ट्रक जात राहिला. त्या दरम्यान ट्रकच्या पुढील बाजूला सीएनजीवर चालणारे एक चारचाकी वाहन अडकून राहिले.**



यामुळे काही मिनिटांत चारचाकी वाहनांने पेट घेतला आणि काही क्षणांत त्या चारचाकी वाहनातील पाच जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली; तर ट्रकमधील तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. तसेच या अपघातामध्ये ट्रकचालकाने टेम्पो, रिक्षा आणि अनेक दुचाकींना धडक दिली होती. यामध्ये वीसहून अधिक नागरिक जखमी झाले होते.त्या घटनेनंतर नवले ब्रीज परिसरात विविध उपाययोजना करण्यात येतील, अशी माहिती प्रशासनाच्या माध्यमातून देण्यात आली होती. ती घटना उलटून पाच दिवस होत नाही तोवर नवले ब्रीज परिसरातील भूमकर चौकाजवळ कंटेनरने एर्टिका, पिकअप व्हॅन या चारचाकी वाहनांसह दुचाकी वाहनांना धडक दिल्याची घटना घडली आहे.या घटनेमध्ये पाच ते सहा नागरिक जखमी झाले आहेत. तर या अपघात प्रकरणातील कंटेनरचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडे पुढील चौकशी करण्यात येत आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 18/11/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# प्रशासनाच्या नाकर्तेपणामुळे शहर प्रदूषणाच्या विळख्यात

## खासदार श्रीरंग बारणे यांचा आरोप

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी-चिंचवड शहरात प्रचंड प्रदूषण वाढले आहे. लोकसंख्येने मोठ्या असलेल्या शेजारील पुण्यापेक्षा पिंपरीतील प्रदूषणात वाढ झाली आहे. शहर प्रदूषणाच्या विळख्यात सापडले आहे. याला सर्वस्वी महापालिका प्रशासन जबाबदार असून कोट्यवधी रुपये खर्च करुनही प्रदूषण कमी होत नसल्याचा आरोप शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी केला आहे.**



याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर यांना पत्र दिले आहे. तातडीने प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना हाती घेण्याच्या सूचना खासदार बारणे यांनी केल्या आहेत. खासदार श्रीरंग बारणे म्हणाले, महापालिकेने शहराची विभागणी करुन साफसफाईचे कंत्राट दोन ठेकेदारांना दिले आहे. परंतु, नियमितपणे शहरातील रस्त्यांची साफसफाई होत नाही. रस्त्यांवर कचऱ्याचे ढिग दिसून येत आहेत. साफसफाई करताना वाहनांची धूळ उडत आहे. वाहनांचीच धूळधाण उडताना दिसते. त्यामुळे धुळीने नागरिक त्रस्त आहेत. साफसफाईवर कोट्यवधी रुपये खर्च करुनही शहरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरातील रस्त्यांवर खड्डेच-खड्डे आहेत. पावसाळा संपूनही खड्डे बुजविले नाहीत.शहरातील विविध भागात मोठ्या प्रमाणात बांधकामे सुरु आहेत. परंतु, बांधकाम व्यावसायिकांकडून प्रदूषण रोखण्यासाठीच्या उपाययोजना केल्या जात नाहीत. खडी, वाळू, क्रश सँड यांची उघड्या वाहनातून वाहतूक केली जात आहे. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे प्रदूषण वाढले आहे. शहरातून वाहणाऱ्या पवना, इंद्रायणी नदीच्या पात्रात राडारोडा टाकला जात आहे. मैलामिश्रित पाणी थेटपणे नदीत सोडले जात आहे.

नदी सुधारवर कोट्यवधी रुपये खर्च करुनही नदीची दयनीय अवस्था आहे. प्रशासन केवळ निविदा काढण्यात दंग आहे. वाढत्या प्रदुषणाचा ज्येष्ठ नागरिक, लहान मुलांना मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे.

श्वसनाचे विकार जडत आहेत. त्यामुळे प्रदूषण कमी करण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा सूचना खासदार बारणे यांनी महापालिका प्रशासनाला दिल्या आहेत.

# नवले ब्रीज वर कंटेनरची पाच ते सहा वाहनांना धडक

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे शहरातील नवले ब्रीजच्या परिसरात गुरुवारी सायंकाळच्या सुमारास भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रकचा ब्रेक निकामी झाल्याने एकापाठोपाठ एक वाहनांना धडक देत, काही अंतर ट्रक जात राहिला. त्या दरम्यान ट्रकच्या पुढील बाजूला सीएनजीवर चालणारे एक चारचाकी वाहन अडकून राहिले.**




यामुळे काही मिनिटांत चारचाकी वाहनांने पेट घेतला आणि काही क्षणांत त्या चारचाकी वाहनातील पाच जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना घडली; तर ट्रकमधील तिघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. तसेच या अपघातामध्ये ट्रकचालकाने टेम्पो, रिक्षा आणि अनेक दुचाकींना धडक दिली होती. यामध्ये वीसहून अधिक नागरिक जखमी झाले होते.त्या घटनेनंतर नवले ब्रीज परिसरात विविध उपाययोजना करण्यात येतील, अशी माहिती प्रशासनाच्या माध्यमातून देण्यात आली होती. ती घटना उलटून पाच दिवस होत नाही तोवर नवले ब्रीज परिसरातील भूमकर चौकाजवळ कंटेनरने एर्टिका, पिकअप व्हॅन या चारचाकी वाहनांसह दुचाकी वाहनांना धडक दिल्याची घटना घडली आहे.या घटनेमध्ये पाच ते सहा नागरिक जखमी झाले आहेत. तर या अपघात प्रकरणातील कंटेनरचालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्याकडे पुढील चौकशी करण्यात येत आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 18/11/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# लवकरच....!

# मेट्रो सिटी

## आयकॉन अवॉर्ड २०२५

METRO CITY ICON

AWARD 2025

### दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त

## पुरस्कार सोहळा २०२५

वर्ष तिसरे

सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.

– आयोजक –

**शबनम न्यूज मिडिया ग्रुप**

शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स

अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734